# नाना गडकरींनी पटकविला ‘मल्हार आयडॉल’ किताब

पनवेल(प्रतिनिधी) रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व पनवेल तालुका आणि शहर कॉंग्रेस कमिटीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या मल्हार महोत्सवातील खास आकर्षण ठरलेल्या ‘मल्हार आयडॉल’ किताबावर नाना गडकरी यांनी आपले नाव कोरले. तर या स्पर्धेत प्रदीप पाटील यांनी व्दितीय आणि नीतू फुसाटे यांनी तृतीय कमाक पटकाविला.

तीन गटांमध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धेत एस वन गटात साहील मगर याने प्रथम, हर्षल पाटीलने व्दितीय तर सॅण्ड्रा झेवियर्स हिने तृतीय कमांक पटकाविला. एस टू गटात सागर म्हात्रे यनो प्रथम, श्वेता ठाकूरने व्दितीय तर सोनाली सोनावणे हिने तृतीय कमांक मिळविला.

या स्पर्धेदरम्यान खास निमंत्रित बालगायिका मिथिला सचीन माळी हीने मनमौजी चित्रपटातील लता मंगेशकर यांनी गायिलेले “मैतो तुम संग नैन मिला के” आणि दुनियादारी मधील ‘टिकटिक वाजते” हे गीत सादर केले. तसेच सोनल रवी नाईक हीने जोगवा चित्रपटातील ‘जीव रंगला” हे द्वंद्वगीत रवी नाईक यांच्यासोबत सादर केले. मल्हार आयडॉलच्या निवड पात्रता फेरीसाठी एकूण ७७ स्पर्धक सहभागी झाले होते. अलिबागपासून मुंबई – ठाणे भागातून स्पर्धक सहभागी झाले होते. त्यातून २१ स्पर्धकांची निवड अंतिम फेरीमध्ये करण्यात आली होती. पात्रता फेरीचे परिक्षण राजू मनोहर आणि सुरेश राव यांनी केले. तसेच पूर्ण स्पर्धेचे संचालन कॉंग्रेस प्रणित पनवेल शहर सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष सचिन माळी व पनवेल शहर कॉंग्रेसचे उपाध्यक्ष रवी नाईक यांनी केले. तर चेतन म्हात्रे, भरत जाधव, मोहन फुंडेकर यांनी सहकार्य केले. विजेत्यांना रोख रक्कम, प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अश्विनी खानोलकर यांनी केले तर परिक्षक म्हणून सुप्रसिध्द गायक माधव भागवत, संध्या घाडगे, अवीद मुश्नी यांनी काम पाहिले. वाद्यवृंद सिंथेसायझरवर संगीत संयोजक अतुल माळी व हनुमान पाटील, ढोलकी व ढोलक प्रविण कदम, ऑक्टोपॅडवर प्रविण भोपी यांनी साथ दिली.

या कार्यकमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, नवी मुंबई कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष दशरथ भगत, नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे सभापती वाय्.टी.देशमुख, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, पनवेल शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष जयंत पगडे, नगराध्यक्षा चारूशिला घरत, जिल्हा चिटणीस ॲड.के.एस.पाटील, शहर प्रवक्ते शशिकांत बांदोडकर, नगरसेवक गणेश पाटील, गणपत म्हात्रे, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, सांस्कृतिक विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर आघारकर, राष्ट्रीय टेबल टेनिसपटू संजय कडू, कोळी समाजाचे अध्यक्ष विश्वनाथ कोळी, सिडकोचे वसाहत अधिकारी पदमाकर नाईक, रोजगार व स्वयंरोजगार सेलचे तालुकाध्यक्ष राज सदावर्ते, गव्हाणच्या सरपंच रत्नप्रभा घरत, महिला व बालकल्याण सभापती निता माळी, महिला कॉंग्रेसच्या शहर अध्यक्षा वर्षा नाईक, कार्याध्यक्षा सुहासिनी शिवणेकर, सुहासिनी केकाणे, जिल्हा महिला उपाध्यक्षा रेश्मा सुंभे, ग्राहक हित कक्षाच्या तालुकाध्यक्षा दर्शना भोईर, तालुका महिला उपाध्यक्षा माया अहिरे, सुगंधा कोळी, कल्पना ठाकूर, कस्तुरी जंगम, सारिका मोरे, अस्मिता गोसावी, मनिषा चिले, शिरवली विभागीय अध्यक्ष शिवाजी दुगे, काळूंद्रे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, पांडूरंग केणी, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, नविन पनवेल विभागीय अध्यक्ष कुमार नाईक आदी मान्यवरांसह रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.